**ज्योतिषविषयक**

सुप्रसिद्ध राज ज्योतिष श्री अंबाजी उपासक प. बाबुभाई शास्त्री जन्मतारीख पाहुन हस्तरेषा, नोकरी, व्यापार, विवाह, संतान, गृहक्लेश, प्रेमवंश, कोर्ट, विजय, वास्तुशास्त्र, शास्त्र, धनलाभ, दारू व्यसन, मनोकामना पुर्ण होण्याची 101% गॅरंटी

**तपस्वी हॉटेल बेसमेंट, 9 इंदिरानगर जॉगिंग ट्रॅकजवळ, मुंबई - आग्रारोड, नाशिक संपर्क : ९८२२८१७९०४**

दैनिक सोलापूर

असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

# कटूसत्य

किंमत ५ रुपये

Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com

DIRECT ADMISSION
MBBS | MD | MS | BDS | MDS
BAMS | BUMS | BHMS
PANCHAKARMA
DERMATOLOGY | NURSING
PHARMACY
PHYSIOTHERAPY
PARAMEDICAL | VETERINARY
OPHTHALMOLOGY | FMGE
Indo Abroad Education
9326134770

सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष २० वे, अंक १५१ वा | बुधवार, दि. १४ जानेवारी २०२६ | पाने: ८ | पोष्ट परवानाः - SLP/04/2026-2028 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR

# राज्यात 12 जिल्हापरिषदांसाठी 5 फेब्रुवारीला मतदान



**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** राज्यात सध्या महापालिका निवडणुकांची रणधुमाळी चालू आहे. प्रचार शिगेलो पोहोचला आहे. संपूर्ण राज्यभरात एकूण 29 महापालिकांची निवडणूक होणार असून 15 जानेवारी रोजी मतदान होईल तर 16 जानेवारी रोजी मतमोजणी होईल. दरम्यान, आता या निवडणुकीची राज्यभरात चर्चा असताना राज्य निवडणूक आयोगाने जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकीची घोषणा केली आहे. संपूर्ण राज्यात आता एकूण 12 जिल्हापरिषद आणि 125 पंचायत समितींची निवडणूक होणार आहे. त्यामुळे आता महापालिकेची निवडणूक संपताच राज्यात पुन्हा एकदा जिल्हा परिषदेच्या निवडणुकीमुळे राजकीय वातावरण ढवळून निघणार आहे.

### १२ जिल्हा परिषद आणि १२५ पंचायत समितीत निवडणूक

राज्यात १२ जिल्हा परिषद आणि १२५ पंचायत समितीत निवडणूक होणार आहे. खालील विभागात पंचायत समिती आणि जिल्हा परिषदांसाठी ही निवडणूक होईल.

- कोकण विभाग- रायगड, रत्नागिरी सिंधुदुर्ग
- पुणे विभाग - पुणे सातारा
- सांगली कोल्हापूर सोलापूर
- संभाजीनगर विभाग - संभाजीनगर परभणी धाराशीव व लातूर

### राज्यात २५ हजार ४८२ मतदान केंद्रे

या निवडणुकीत प्रत्येक मतदारांना दोन मते द्यायचे आहेत. एक मत जिल्हा परिषद आणि दुसरं मत पंचायत समितीसाठी द्यायचे आहे. इच्छुकांना ऑफलाईन पद्धतीने अर्ज करता येईल. तसेच ज्या ठिकाणी जारा राखीव आहेत, तिथे उमेदवारांना जात पडताळणी प्रमाणपत्र द्यावे लागणार आहे. निवडून आल्यावर सहा महिन्यात जातप्रमाणपत्र द्यावं लागेल. नाही दिलं तर त्याची निवड रद्द होईल. राज्यात २५ हजार ४८२ मतदान केंद्रे आहेत. ईव्हीएमच्या मदतीने ही निवडणूक होईल. या मतदानासाठी ५५ हजार कंट्रोल युनिट, १ लाख १० हजार बॅलेट युनिट, २५ हजार ४८२ मतदान केंद्रात वीज, पिण्याचे पाणी शौचालय अशी व्यवस्था केलेली असेल. काही पिंक मतदान केंद्र असतील.

# प्रभाग ४ मधील बेरोजगार तरुण व महिलांसाठी उद्योग उभारणार - सी.ए. सुशील बंदपट्टे

## महानगरपालिकेत आर्थिक शिस्त व स्थैर्य येणार - मतदारांचा ठाम विश्वास






**सोलापूर (कटूसत्य वृत्त) :-** महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस व शिवसेना युतीचे अधिकृत उमेदवार चार्टर्ड अकाउंटंट सुशील चंदू बंदपट्टे यांना प्रभाग क्रमांक ४ मधील नागरिकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. आर्थिक शिस्त, पारदर्शक प्रशासन आणि नियोजनबद्ध कारभार ही त्यांची ठळक ओळख असून, नगरसेवक म्हणून निवडून आल्यास महानगरपालिकेच्या कामकाजात आर्थिक स्थैर्य निर्माण होईल, असा ठाम विश्वास मतदार व्यक्त करत आहेत.

सुशासन, उत्तम प्रशासन व कारभारात अनुशासन म्हणजेच राष्ट्रवादी काँग्रेसचे घड्याळ चिन्ह, अशी भावना नागरिकांमध्ये दृढ होत आहे. 'आपला माणूस' म्हणून सी.ए. सुशील बंदपट्टे यांच्याकडे पाहिले जात असून, त्यांच्या व्यावसायिक अनुभवाचा थेट लाभ प्रभागाच्या व शहराच्या विकासासाठी होणार असल्याचे मत नागरिक व्यक्त करत आहेत.

प्रचारादरम्यान अनेक नागरिकांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलेल्या विधानाचा उल्लेख करत सांगितले की, 'माझ्या सहीपेक्षा सी.ए.च्या सहीला जास्त किंमत आहे', हे विधान सी.ए. सुशील बंदपट्टे यांच्या कार्यक्षमतेचे व विश्वासार्हतेचे प्रतीक आहे. त्यामुळे महानगरपालिकेतील आर्थिक गैरव्यवहारांना आळा बसेल आणि विकासकामे शिस्तबद्ध पद्धतीने मार्गी लागतील, अशी अपेक्षा मतदारांमधून व्यक्त होत आहे.

सी.ए. सुशील बंदपट्टे यांनी आपल्या प्रचारात प्रभागातील बेरोजगार तरुणांना रोजगार उपलब्ध करून देणे, महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी कुटीर उद्योग व (पान 2 वर..)

श्री शिवयोगी सिद्धरामेश्वरांच्या यात्रेनिमित्त येणाऱ्या तमाम भाविकांचे हार्दिक स्वागत व मकरसंक्रांतीच्या हार्दिक शुभेच्छा...!



-: शुभेच्छुक :-

मा.श्री.केदारनाथ उंबरजे

संचालक, सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समिती
माजी नगरसेवक, माजी स्थायी समिती सभापती
सोलापूर महानगरपालिका

# सोलापूरचे ग्रामदैवत सिध्देश्वर मंदिर येथे अक्षता सोहळा उत्साहात संपन्न





**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** शिवयोगी श्री सिध्दरामेश्वराच्या आशीवार्दाने पुण्य पावन झालेल्या सोलापूर शहर श्री सिध्देश्वर मंदीर येथील संमती कट्टा येथे अक्षता सोहळा उत्साहात पार पडला. संमती कट्टा येथे प्रत्येकवर्षी राजदंड व कुंभार कन्या यांचा विवाह सोहळा आयोजित करण्यात येतो. प्रथम संमतीकट्टा येथे पालखी व योगदंडाचे आगमन झाले व त्यानंतर नंदीध्वजाचे आगमन झाले. गंगापूजा व सुगडीपजनानंतर अक्षता सोहळयास सुरुवात झाली.

या सोहळयास महानगरपालिका आयुक्त डॉ. सचिन ओंबासे, सोलापूर शहर पोलिस आयुक्त एम. राजकुमार, सोलापूर ग्रामीण पोलिस आयुक्त अतुल कुलकर्णी, श्री गौहर हसन, श्रीमती आश्विनी पाटील, श्री विजय कबाडे, मनपा आयुक्त आकुलवार, जगदगुरु डॉ. मल्लीकार्जुन महाचार्य स्वामी, माजी खासदार जयसिध्देश्वर महास्वामी, धर्मराज काडादी, मानकरी राजशेखर हिरेहब्बू व समस्त हिरेहब्बू परिवार, पंचकमिटीचे सर्व पदाधिकारी आदी मान्यवर हा अक्षता सोहळा पाहण्यासाठी आलेले भाविक व बारबंदी वेश परिधान केलेले भक्तगण यांच्या उपस्थितीत हा अक्षता सोहळा उत्साहात संपन्न झाला.

VNP MOTORS
VNP MOTORS MULTIBRAND CAR SALES & SERVICE
Multi Brand Car Sales & Services
सोलापूर मध्ये पहिले मल्टिब्रँड कार चे सुसज्ज शोरूम व वर्कशॉप
OFFER
पेट्रोल कार - SYNTHETIC OIL सर्व्हिस करा फक्त ₹2949/-
डिजेल कार - SYNTHETIC OIL सर्व्हिस करा फक्त ₹3649/-
AC OVERHAUL | HATCHBACK RS. 2500/- | SEDAN - 3000/- SUV - 3500/-
FREE PICK-UP & DROP
CNG RTO मान्यता प्राप्त CNG Retro Fitment Center
8000-92-8007
Trusted & Approved for Leading Brands
VNP MOTORS Pvt. Ltd.
Exclusive showroom of Second Hand Car Sales & Service
GAT No. 17/2, Hyderabad Road, Next to Ford Showroom, Solapur - 9591958007
GOVT. APPROVED CNG RETROFITTMENT CENTER & WORKSHOP

# श्री सिद्धेश्वर यात्रेनिमित्त पालखी व सातही नंदी ध्वजांचे विधिवत पूजन



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** श्री सिद्धेश्वर यात्रेच्या पार्श्वभूमीवर आज सोलापूर महानगरपालिकेचे आयुक्त मा. डॉ. सचिन ओम्बासे यांनी आयुक्त निवसास्थान येथे सहपत्नी परिवारसह श्रद्धापूर्वक श्री शिवयोगी सिद्धरामेश्वर महाराज यांच्या पालखीचे तसेच सातही नंदी ध्वजांचे विधिवत पूजन केले. पारंपरिक विधी, मंत्रोच्चार आणि भक्तिमय वातावरणात हा पूजन सोहळा पार पडला. श्री सिद्धेश्वर महायात्रा ही (पान 2 वर..)

१४ जानेवारी

सोलापूर जिल्ह्याचे भाग्यविधाते

सहकार महर्षि

शंकरराव नारायणराव मोहिते-पाटील

यांच्या जयंती निमित्त-

॥ विनम्र अभिवादन ॥



*सहकार महर्षि शंकरराव मोहिते-पाटील महाविद्यालय,नातेपुते
*प्रतापसिंह मोहिते-पाटील महाविद्यालय,करमाळा
संचालक मंडळ,प्राचार्य,प्राध्यापक,शिक्षकेतर कर्मचारी,विद्यार्थीवर्ग

## संपादकीय

# निवडणूक आयोगाची भूमिका की सत्ताधाऱ्यांची सोय?

लोकशाहीत निवडणूक आयोग हा निष्पक्ष, स्वायत्त आणि विश्वासार्ह संस्था म्हणून ओळखला जातो. निवडणुकीतील समान संधी, न्याय्य स्पर्धा आणि मतदारांचा मुक्त निर्णय या तत्त्वांचे रक्षण करण्याची जबाबदारी आयोगावर असते. मात्र अलीकडच्या निवडणूक निर्णयांमुळे आयोगाच्या भूमिकेवर गंभीर प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे. नुकत्याच पार पडलेल्या नगरपरिषद निवडणुकांमध्ये मतदानाच्या आदल्या दिवशी रात्री दहा वाजेपर्यंत प्रचार करण्यास निवडणूक आयोगाने परवानगी दिली होती. ही बाब आधीच वादग्रस्त ठरली असतानाच, आता मुंबई महापालिका निवडणुकीत तर प्रचाराची वेळ संपल्यानंतरही उमेदवारांना घरोघरी जाऊन प्रचार करण्याची मुभा देण्यात आली आहे. अशा प्रकारचा निर्णय देशातील निवडणूक इतिहासात पहिल्यांदाच घेतला जात असल्याचे दिसते.

प्रचारबंदीचा काळ म्हणजे मतदारांनी शांतपणे विचार करून निर्णय घेण्याचा काळ असतो. त्या काळात कोणताही उमेदवार, पक्ष किंवा कार्यकर्ता थेट मतदारांच्या दारात जाऊन प्रचार करतो, हे लोकशाहीच्या मूलभूत तत्त्वांनाच धक्का देणारे आहे. घरोघरी जाऊन प्रचार करण्यास दिलेली ही मुभा म्हणजे प्रत्यक्षात ह्घरोघरी लक्ष्मीदर्शनासाठी दिलेली अधिकृत मंजुरीह्व असल्याची भावना जनमानसात निर्माण होणे स्वाभाविक आहे.

या निर्णयाचा फायदा नेमका कोणाला होणार, हा प्रश्न टाळता येत नाही. आर्थिकदृष्ट्या सक्षम, सत्ताधारी पक्ष आणि त्यांच्याकडे असलेली यंत्रणा लक्षात घेतली, तर हा निर्णय म्हणजे अप्रत्यक्षपणे त्यांनाच दिलेली सवलत असल्याचे चित्र उभे राहते. त्यामुळे भाजप आणि निवडणूक आयोग यांच्यात साटेलोटे झाले आहे का? असा संशय व्यक्त होणे गैर नाही. निवडणूक आयोगाकडून घेतले जाणारे निर्णय हे पारदर्शक, तर्कसंगत आणि सर्व पक्षांना समान न्याय देणारे असायला हवेत. मात्र अलीकडील निर्णयांमुळे आयोगाची स्वायत्तता आणि निष्पक्षता धोक्यात येत असल्याचा आरोप विरोधकांसह सामान्य नागरिकही करत आहेत. लोकशाही व्यवस्थेचा कणा असलेल्या संस्थेवर जर जनतेचा विश्वास डळमळीत झाला, तर ते देशासाठी अत्यंत घातक ठरेल.

तथापि, लोकशाहीत अंतिम सत्ता ही मतदारांच्या हातातच असते. कितीही डावपेच आखले, नियम शिथिल केले किंवा सत्तेचा गैरवापर केला, तरी स्वाभिमानी, सजग आणि जागरूक मतदार हा डाव नक्कीच हाणून पाडतील, असा विश्वास ठेवायला हरकत नाही. मुंबईचा मतदार सुज्ञ आहे; तो लोकशाहीची किंमत ओळखतो आणि योग्य वेळी योग्य निर्णय देण्याची क्षमता त्याच्यात आहे.

निवडणूक आयोगानेही वेळेत आत्मपरीक्षण करावे आणि कोणत्याही पक्षाच्या सोयीसाठी नव्हे, तर लोकशाहीच्या मूल्यांसाठी काम करावे, हीच लोकशाहीप्रेमी नागरिकांची अपेक्षा आहे.

# प्रचारबंदी की प्रचाराला मोकळे रान?

### उमेदवार घरोघरी फिरू शकतातच कसे? – निवडणूक प्रक्रियेवर गंभीर प्रश्न

निवडणूक प्रक्रिया ही केवळ मतदानाचा कार्यक्रम नसून ती लोकशाहीची कसोटी असते. त्यामुळे निवडणूक आयोगाने आखलेले नियम, प्रचारबंदीचा कालावधी आणि आचारसंहिता या साऱ्या बाबी अत्यंत काटेकोरपणे पाळल्या जाणे अपेक्षित असते. मात्र अलीकडे समोर आलेल्या एका व्हिडिओमुळे आणि त्यावरून दिलेल्या खुलाशांमुळे या संपूर्ण प्रक्रियेवरच संशयाची छाया पसरली आहे.

प्रचार कालावधी अधिकृतपणे संपल्यानंतरही उमेदवार घरोघरी जाऊ शकतात का, असा मूलभूत प्रश्न उपस्थित झाला आहे. विशेष म्हणजे याच पार्श्वभूमीवर पैसे वाटप, भेटवस्तू, 'लक्ष्मीदर्शन' यासारख्या आरोपांवर चर्चा सुरू असताना, संबंधित अधिकाऱ्यांकडून दिली जाणारी उत्तरे अधिक गोंधळात टाकणारी ठरत आहेत. निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांनी दिलेली उत्तरे ही प्रश्नांचे निरसन करणारी नसून, शंका अधिक गडद करणारी असल्याची भावना जनमानसात आहे.

प्रचारबंदीचा उद्देश स्पष्ट आहे, मतदानापूर्वी मतदारांना शांतपणे, कोणत्याही दबावाशिवाय विचार करण्याची संधी मिळावी. अशा वेळी 'घरोघरी भेट देणे म्हणजे प्रचार नाही' असा युक्तिवाद केला जात असेल, तर तो केवळ शब्दांचा खेळ ठरतो. उमेदवार जर मतदारांच्या दारात जाऊन संवाद साधत असतील, तर तो थेट प्रभाव टाकण्याचाच प्रकार ठरतो, हे नाकारता येणार नाही.

या परिस्थितीत पैशांचे वाटप, भेटवस्तू देणे किंवा आश्वासनांचा पाऊस पाडणे यासारख्या गैरप्रकारांना आळा कसा बसणार, हा प्रश्न अनुत्तरितच राहतो. उलटपक्षी, अशा प्रकारे घरोघरी फिरण्यास मोकळीक दिली, तर आर्थिकदृष्ट्या बलवान उमेदवारांसाठी हा सुवर्णसंधीच ठरेल. सामान्य, प्रामाणिक उमेदवार मात्र या शर्यतीत मागे पडतील, आणि ही बाब लोकशाहीच्या तत्त्वांशी विसंगत आहे.

निवडणूक आयोगाच्या नियमांची अंमलबजावणी ही केवळ कागदावर न राहता प्रत्यक्षातही तितकीच कडक असायला हवी. एखाद्या व्हिडिओतून प्रश्न उपस्थित झाले असताना, ह्नियमांत बसतेह्व असे ढोबळ उत्तर देणे म्हणजे जबाबदारी झटकण्यासारखे आहे. आयोगाने स्पष्ट, ठाम आणि सर्वांना समान लागू होतील असे स्पष्टीकरण देणे अपेक्षित आहे. आज मतदार अधिक जागरूक आहे. तो सोशल मीडियावर फिरणारे व्हिडिओ पाहतो, प्रश्न विचारतो आणि उत्तरांची चिकित्सा करतो. अशा वेळी जर नियमांचा अर्थ सत्ताधाऱ्यांच्या सोयीने लावला जात असेल, तर निवडणूक आयोगाच्या विश्वासार्हतेवरच प्रश्नचिन्ह उभे राहते.

शेवटी, लोकशाहीतील अंतिम न्यायाधीश हा मतदारच असतो. नियमांचा गैरफायदा घेण्याचे प्रयत्न, प्रचारबंदीची पायमल्ली आणि पैशाच्या जोरावर मतं विकत घेण्याचे डाव स्वाभिमानी मतदार नक्कीच ओळखतील आणि योग्य ठिकाणी त्यांना उत्तर देतील, असा विश्वास ठेवायला हरकत नाही. मात्र तोपर्यंत निवडणूक आयोगाने 'स्पष्टीकरण' देण्याऐवजी 'जबाबदारी' स्वीकारण्याची वेळ आली आहे, एवढे मात्र नक्की.

# शेतकरी, सहकार आणि शिक्षणाचा महामार्ग सहकार महर्षी शंकरराव मोहिते-पाटील

काळाच्या विशाल पटलावरती स्वतःच्या कार्यकतृत्वाचा ठसा उमठविणा-या महापुरुषांच्या नामावलीत सहकार महर्षी शंकरराव मोहिते-पाटील यांचे नाव अग्रक्रमाने घ्यावे लागेल. व्यक्तीच्या जाण्यानंतर प्रत्येकालाच समाज स्मरणात ठेवतोच असे नाही. कारण त्यांचे कार्य मर्यादित असते. परंतु सहकार महर्षी शंकरराव मोहिते-पाटील यांचे कायार्ने गेली अनेक दशक महाराष्ट्राच्या राजकीय, सामाजिक, शेती, शिक्षण, सहकार आणि सांस्कृतिक जीवनाला व्यापून राहिलेले नेतृत्व. महाराष्ट्राच्या सहकारी चळवळीचे शिलेदार असलेले सहकार महर्षींचे जीवनकार्य म्हणजे भविष्यातील अनंत काळापर्यतच्या पिढ्यांना नवचैतन्य, प्रेरणा आणि स्फूर्ती देणारा चिरंतन झरा होय.

थोर पुरुषांप्रमाणे आपण काहीतरी करावे. लोकांचे दुःख हलके करण्यासाठी आपणही प्रयत्न करायला हवे असे त्यांना वाटू लागले. स्वतःपेक्षा इतरांच्या सुख दुःखाची भावना त्यांच्या अंतर्मनात रुजली होती. प्रतिकूल परिस्थितीमुळे आपण पुरेसे शिक्षण घेऊ शकलो नाही याची खंत सहकार महर्षींच्या मनाला लागून राहिली होती. शिक्षणापासून वंचित असणा-या सवार्नांचा पुढे आणण्यासाठी शिक्षण हे साधन खूप महत्वाचे वाटले. देश स्वातंत्र्य झाल्यानंतर अकलूज परिसरातील जनतेने दिलेल्या ५०१ रु. च्या रक्कमेत तेवढ्याच रकमेची भर घालून स्वतःच्या मालकीची ११ एक्कर उत्तम प्रतीची जमीन देऊन 'अकलूज शिक्षण प्रसारक' मंडळाची स्थापना केली. त्यांच्या कायार्ला आशीर्वाद देण्यासाठी राष्ट्रसंत श्री.तुकडोजी महाराज व कर्मवीर भाऊराव पाटील अकलूज येथे आले होते. तालुक्याच्या पश्चिम भागाच्या सर्वांगीण विकासासाठी लोकनेते प्रतापसिंह मोहिते-पाटील यांनी सहकार महर्षी शंकरराव मोहिते-पाटील प्रतिष्ठानच्या वतीने नातेपुते येथे सहकार महर्षी शंकरराव मोहिते-पाटील महाविद्यालयाची स्थापना केली. इ.११वी पासून पदवी व पदव्युत्तर पर्यंतचे बहुशाखीय शिक्षणाची व पी.एचडी पर्यंत शिक्षणाची सोय सर्वाना उपलब्ध झाली आहे. लोकनेते प्रतापसिंह मोहिते-पाटील



यांनी फक्त आपल्या तालुक्याचा विचार केला नाही तर जिल्ह्यातील करमाळा येथे प्रतापसिंह मोहिते-पाटील महाविद्यालयाची स्थापना केली. यांच्या पाठीमागील प्रेरणा सहकार महर्षी यांचीच होती हे दोन्ही महाविद्यालयाचे कामकाज पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांच्या सिनेट व मॅनेजमेंट कौन्सिलच्या सदस्या मा.पद्मजादेवी प्रतापसिंह मोहिते-पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली उत्कृष्टपणे कार्यरत आहेत.

शैक्षणिक विकासाबरोबरच सहकार महर्षीनी केवळ 'नीरा पाणी कॅनाल संघर्ष,. १९४२ च्या चलेजाव व भारत छोडो या स्वातंत्र्य संग्रामात सक्रीय सहभाग. स्वंतत्र सैनिक, अकलूजचे सरपंच ते माळशिरस तालुक्याचे आमदार अशी राजकीय कारकीर्द आहे. शेतक-यांच्या मालाला योग्य किंमत मिळण्यासाठी 'कृषी उत्पन्न बाजार समितीची' स्थापना केली. 'शेतकरी सहकारी खरेदी-विक्री' संघाची स्थापना. १९६० मध्ये सहकार महर्षी शंकरराव मोहिते-पाटील साखर कारखाना व सदाशिवनगर येथील श्री.शंकर सहकारी साखर कारखाना याची निर्मिती. तालुक्यातील अल्पभूधारक शेतकरी, शेतमजूर विविध सहकारी संस्था मधील कर्मचारी व आर्थिक दृष्ट्या कुमकुवत वर्गातील घटकांना स्वावलंबी बनविण्यासाठी 'कुकुटपालन' संघाची स्थापना केली. तसेच शेतीला पूरक व्यवसाय म्हणून दुध उत्पनाची माहिती स्वतः घेवून बेंगलोर ला जावून गाई खरेदी केल्या व शेतकऱ्यांना त्याचे आर्थिक महत्व पटवून देण्याचे काम त्यांनी केले. यातून दुधाचे उत्पन्न वाढावे म्हणून १९७६ मध्ये 'शिवामृत दुध उत्पादक संघाची' स्थापना केली. समाजाच्या विकास कामासाठी, कर्जपुरवठा करणेसाठी व उद्योगधंदे वाढीस मदत होण्यासाठी 'शेतकरी सहकारी बँकेची' स्थापना केली.

शेतक-यांच्या विषयी त्यांच्या मनात फार जिव्हाळा होता. शेतक-याच्या जमिनीच्या सिलिंग विषयी कायद्याच्या विरोधात खूप आवाज उठविला होता. 'सामुदायिक विशाल विहीर' योजना महाराष्ट्रात सर्वप्रथम सहकार महर्षीनी साकारली. महाराष्ट्राच्या कृषी, शिक्षण सहकार चळवळीला मूर्त स्वरूप देण्यामध्ये त्यांच्या मोलाचा वाटा आहे. सहकार महर्षी शंकराव मोहिते-पाटील कलेचे व सौंदयार्चे चाहते होते. कला माणसाचे जीवन समृद्ध बनवते मनुष्य दुःख विसरून आनंद लुटतो. सहकार महर्षी संगीत ,नृत्य, गायन, अभिनय, नाटक, इत्यादी कलांचे रसिक होते. त्याचबरोबर कुस्ती, गझीढोल, लेझीम खेळ त्यांना प्रिय होते. तसेच सहकार महर्षीनी दुर्लक्षित अशा लावणी कलावंताना व तमाशा कलावंताना प्रोत्साहन दिले. अशा सर्व मदार्नी खेळांचे आयोजन व कलावंताना प्रोत्साहन देण्यसाठी त्यांचे नातू युवानेते डॉ.धवलसिंह प्रतापसिंह मोहिते-पाटील सातत्याने कार्यरत आहेत.

माणसे जोडण्याची कला वाईट परिस्थितीशी झगडण्याची, दूरदृष्टीने योजना आखण्याची व त्या अंमलात आणण्याची कला व नेतृत्वगुण सहकार महर्षी यांच्या अंगी होते. गोरगरिबांच्या भल्यासाठी काम करणे ही त्यांची धारणा होती. कंटाळा व आळस या गोष्टीना त्यांचा जीवनात अजिबात थारा नव्हता. त्यांच्या कायंर्ची उंची पाहता त्यांचा गौरव करण्यासाठी १९६६ रोजी अकलूज येथे जनतेच्या वतीने सभा घेण्यात आली व त्यावेळी शंकराचार्याच्या उपस्थितीत सहकार महर्षी शंकरराव मोहिते-पाटील यांना 'सहकार महर्षी' ही उपाधी बहाल करण्यात आली. अशा या शेतकरी, सहकार आणि शिक्षणाचा यशस्वी महामागार्चा अवलंब करणाऱ्या सहकार महर्षी शंकरराव मोहिते-पाटील यांना जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन.

**– प्रा.उत्तम सावंत**
सहकार महर्षी
शंकरराव मोहिते पाटील
महाविद्यालय, नातेपुते.

# 'खडकावर बीजारोपण करणारे' स.म.शंकरराव मोहिते पाटील

महाराष्ट्राला खऱ्या अर्थाने सहकाराची ओळख करून देणारे व महाराष्ट्राच्या जडणघडणीत मोलाचा वाटा असणारे सहकार महर्षी शंकरराव मोहिते-पाटील यांच्या जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन..... माळशिरस तालुका तसा बघितला तर ओसाड व माळरान आणि ग्रामीण भाग. तेथील लोकांच्या समस्या लोखंडी सागरासारख्या होत्या. "गोरगरीब समाजासाठी काहीतरी करायचे, नांगरलेल्या शेतातून सोनं उगवावं, हिरव्या गालिच्याने सगळीकडे आच्छादित व्हावं. रात्रीच्या तारांगणात सगळीकडे उजेड पसरावा, ध्येयनिष्ठेने वेडे झालेले सहकार महर्षी प्रचंड महत्वकांक्षा बाळगून काम करीत होते" खडतर परिश्रम आणि आत्मविश्वासाच्या जोरावर अनेक अडचणींवर मात केली आणि एक आदर्श निर्माण केला. माळशिरस तालुक्याचे नंदनवन केले. सहकार महर्षींच्या कायार्तून सर्वसामान्य जनतेला प्रेरणा मिळते कठीण परिस्थितीतही हार न मानता साहेब पुढे गेले. "खडतर परिश्रम आणि आत्मविश्वासाच्या जोरावर अशक्य ते शक्य करून दाखवले आणि नवीन दृष्टीकोन स.म.शंकरराव मोहिते पाटील यांनी दिला"

सहकाराचे जाळे निर्माण करून गोरगरीब जनतेवर प्रचंड दयाळूपणा दाखवून सर्वांना मदत करायचीच, तंत्रज्ञानामुळे शेतकऱ्यांपर्यंत पोहोचायचेच हीच खरी प्रगती होईल हा मनाशी केलेला ठामनिश्चय! धोरणे आणि मार्ग जरी वेगळे असले तरी जनतेचे हित जोपासत काम करायचे, जनतेची भूक दूर करीत हरितक्रांतीचा पाया रचला. गरीबांचा उत्कर्ष करायचा असेल, त्यांनी गरीबी दूर करायची असेल तर हाताला काम मिळाले पाहिजे. म्हणून सहकाराच्या माध्यमातून साखर कारखाने, कुक्कुटपालन, सुतगीरण, शेतकऱ्यांच्या मालासाठी खरेदी विक्री संघ, सहकारी बॅक अशा अनेक गोष्टी चालू केल्या. त्यामुळे आजची पिढी माळशिरस तालुक्यातील चांगले जीवन जगत आहे.

शेतकऱ्यांनी आपल्या शेतीबरोबर पूरक व्यवसाय करावा दुष्काळी छायेतला प्रदेश पावसाची श्वाश्वती नसलेला परिसर पाण्याखाली भिजवणार, हजारो वर्षाचे दारिद्रय संपवणार कर्तृत्वाचा डोंगर उभा करायचा हाच गुण या मातीनं शिकवला, प्रश्नाचे उत्तर मिळो अथवा न मिळो उत्तराची दिशा शोधायचीच, ग्रामीण भागातील तरूणांना घडवायचच, तरूण पिढी जर आपण घडवू शकलो नाही तर सर्व काही व्यर्थ आहे. त्यांच्या चेहऱ्यांवरील दारिर्द्याच्या, कंगालपणाच्या रेषा पुसून आत्मनिर्भर बनवायचं, शिकलेली व्यक्ती आजन्म फुलत राहीली पाहीजे. ती कधीच उपाशी किंवा अधाशी नसली पाहिजे. त्याच्या अंगी नवनिर्मितीचे सामर्थ्य असले पाहिजे. शिक्षणामुळे आत्मबोध घडावा. उपजीविकेबाबतीत व्यक्तीची स्वाधीनता वाढावी



म्हणून शिक्षण प्रसारक मंडळ व सहकाराच्या माध्यमातून अनेक व्यवसाय सुरू केले.

महाराष्ट्राला खऱ्या अर्थाने सहकाराची ओळख करून देऊन महाराष्ट्राच्या जडणघडणीत मोलाचा वाटा उचलला. सिंचन सुविधांचा विकास करून शेतकऱ्यांना वर्षभर पाणी मिळवून देण्याची व्यवस्था केली. दुष्काळी भागात रोजगाराच्या संधी निर्माण केल्या आणि स्थानिक लोकांना स्वावलंबी बनवले.

आर्थिक विकास झाला आणि लोकांच्या जीवनमानात सुधारणा झाली. साहेबांच्या कार्यामुळे सामाजिक बदल घडून आला आणि लोकांमध्ये एकता आणि सहकायार्ची भावना निर्माण झाली. पर्यावरण संवर्धनाच्या कार्यातही महत्त्वपूर्ण योगदान दिले आणि दुष्काळी भाग, खडकाळ भाग हिरवळ केला.

सामान्य माणसाच्या हिताची काळजी वाहणारी तरूण पिढी जर आपण घडवू शकलो नाही तर सर्व काही व्यर्थ आहे. तसेच अद्ययावत ज्ञान मिळविण्या शिवाय पिढी पुढे जाणार कशी सामाजिक वैचारिक परिवर्तन घडवायचे असेल तर शिक्षण हाच पर्याय आहे. म्हणून शिक्षण प्रसारक मंडळ अकलूजची स्थापना केली. आज हजारो विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. कामाचा डोंगर उभा करायचा हे करीत असताना श्रेयासाठी मागे वळून पाहायला सुद्धा सवड उरली नाही गावोगावी माळामाळावर नवे जग उभे केले. गोरगरीबांना आधार दिला. आपल्या जिवनात जगण्यासाठी नुसत सुखच पाहील नाही. तर दुष्काळी भागाला सिंचन योजना सुरू करुन खडतर परिस्थितीत ही खडकावर बीजारोपण केले आणि माळशिरस तालुका हिरवागार केला. कोणाबद्दलही किल्मिष न बाळगता आयुष्यभर झुंजले. आणि आपल्या यशाचे नवे सोनेरी पान लिहिले. त्यांच्या जीवनातील आदर्श, त्यांचे कार्य आणि त्यांनी समाजासाठी केलेले योगदान कायमस्वरूपी लोकांच्या स्मरणात राहील. महाराष्ट्राला खऱ्या अर्थाने सहकाराची ओळख करून देणारे व महाराष्ट्राच्या जडणघडणीत मोलाचा वाटा असणारे सहकार महर्षी शंकरराव मोहिते-पाटील यांचा जन्म माळशिरस तालुक्यात झाला याचा सार्थ अभिमान आम्हाला आहे.

**– प्रा. काटकर**
**तात्यासाहेब शिवाजी**
अकलूज ९२२६१४४८३६
(महाराष्ट्र शासनाचा आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त शिक्षक असून शैक्षणिक व सामाजिक विषयावर लेखन करतात)

# लक्ष्मी-आनंद विद्यामंदिरमध्ये विविध उपक्रमांतून राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद जयंती उत्साहात साजरी

**टेंभुर्णी (कटूसत्य वृत्त):-** लक्ष्मी-आनंद विद्यामंदिर व ज्युनिअर कॉलेज, टेंभुर्णी येथे स्वराज्य प्रेरिका राजमाता जिजाऊ आणि युवकांचे प्रेरणास्थान स्वामी विवेकानंद यांच्या संयुक्त जयंतीनिमित्त विविध शैक्षणिक व सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाची सुरुवात उपस्थित मान्यवरांच्या शुभहस्ते प्रतिमापूजन व दीपप्रज्वलनाने करण्यात आली. यानंतर सामूहिकरित्या जिजाऊ वंदना घेण्यात आली.

या प्रसंगी विद्यार्थ्यांनी राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या वेशभूषा साकारून उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. तसेच त्यांच्या जीवनचरित्रावर आधारित काव्य सादरीकरण व मनोगतांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी आपले विचार प्रभावीपणे मांडले. यावेळी शिक्षक प्रतिनिधी म्हणून भाग्यश्री चिंतामण मॅडम यांनी आपले मनोगत सादर करून विद्यार्थ्यांना प्रेरणादायी मार्गदर्शन केले.

संस्थेच्या सचिवा सौ. सुरजाताई बोबडे यांनी आपल्या भाषणात सांगितले की, राजमाता जिजाऊंचे जीवनचरित्र आचरणात आणताना प्रत्येक स्त्री स्वावलंबी झाली पाहिजे. तिने यशस्वी उद्योजकतेकडे वाटचाल करावी, तसेच आपल्या आचार-विचारांत सकारात्मक परिवर्तन घडवून कौटुंबिक व सामाजिक जीवनात आदर्श निर्माण करावा, असे त्यांनी नमूद केले.

या कार्यक्रमप्रसंगी टेंभुर्णी ग्रामपंचायतीच्या वतीने राबविण्यात आलेल्या मोफत ब्युटी पार्लर कोर्सचे प्रमाणपत्र वितरण करण्यात आले. या उपक्रमाचा ५०० हून अधिक महिलांनी लाभ घेतला असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

सदर कार्यक्रमास संस्थेचे अध्यक्ष योगेश बोबडे, सचिवा सुरजा बोबडे, जिजाऊ ब्रिगेडचे सर्व पदाधिकारी, शाहिदा पठाण, प्राचार्य विकास करळे, जनसंपर्क अधिकारी सागर खुळे यांच्यासह पालक, नागरिक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात यशस्वीरीत्या पार पडला.

# भ्रष्टाचारमुक्त पालिकांसाठी जागरूक मतदारांची भूमिका महत्त्वाची-हेमंत पाटील

**पुणे, (कटूसत्य वृत्त):-** भ्रष्टाचाराविरोधात लढणाऱ्या, भ्रष्टाचाराला खतपाणी न घालणाऱ्या उमेदवारांनाच नागरिकांनी निवडून दिले पाहिजे. भ्रष्टाचारमुक्त महानगरपालिका व पारदर्शक प्रशासनासाठी जागरूक आणि भ्रष्टाचारविरोधी नागरी भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे, असे प्रतिपादन भारत अगेन्स्ट करप्शनचे राष्ट्रीय अध्यक्ष व ओबीसी नेते हेमंत पाटील यांनी मंगळवारी (ता.१३) केले. जातपात, आमिषांना बळी



न पडता प्रत्येकाने येत्या १५ जानेवारीला होवू घातलेल्या महानगरपालिका निवडणुकांमध्ये मतदान करण्याचे आवाहन त्यांनी यानिमित्ताने केले आहे.

या निवडणुकीच्या माध्यमातून मतदारांना योग्य उमेदवार निवडून देऊन शहराच्या विकासाला दिशा देण्याचा अधिकार मतदानातून मिळतोय. त्यामुळे हे अमूल्य मत विकासाभिमुख, प्रामाणिक आणि जनतेसाठी काम करणाऱ्या उत्तम उमेदवारांनाच द्यावे. प्रभागातील स्वच्छता, आरोग्य यंत्रणा, शिक्षण तसेच पाणीपुरवठ्यासह स्थानिक मुद्दये लक्षात घेवून मतदारांनी मतदान करावे, असे आवाहन पाटील यांनी केले.

निवडणुकीच्या शेवटच्या दोन दिवसांत मतदारांना प्रलोभने देण्याचे प्रकार वाढतात. पैसे वाटप, वस्तूंचे आमिष दाखवणे अशा गैरप्रकारांना नागरिकांनी बळी पडू नये. मतदार हा लोकशाहीचा कणा असून त्याने सजग व जबाबदार भूमिका घेतली पाहिजे. तात्पुरत्या लाभासाठी मत विकणे म्हणजे आपल्या शहराच्या भविष्यास धोका निर्माण करणे होय, असे त्यांनी ठामपणे सांगितले.

स्थानिक स्वराज्य संस्था अधिक सक्षम, पारदर्शक आणि जनहिताभिमुख करण्यासाठी स्वच्छ प्रतिमेचे, भ्रष्टाचारमुक्त नेतृत्व निवडून देणे गरजेचे आहे. प्रत्येक मतदाराने आपले मत योग्य ठिकाणी वापरून लोकशाही मजबूत करण्यासाठी योगदान द्यावे, असे आवाहनही हेमंत पाटील यांनी यावेळी केले.

पान १ वरून

# प्रभाग ४ मधील बेरोजगार तरुण व महिलांसाठी...

स्वयंरोजगाराचे प्रकल्प मोठ्या प्रमाणावर उभे करणे, तसेच मूलभूत नागरी सुविधा अधिक सक्षम करण्याचा निर्धार व्यक्त केला आहे. बदलत्या काळानुसार विकासाचा वेग वाढवण्यासाठी सक्षम, अभ्यासू आणि प्रामाणिक नेतृत्वाची गरज असून, तो विश्वास आज प्रत्येक मतदाराच्या डोळ्यांत दिसून येत असल्याचे चित्र आहे.

या वेळी राष्ट्रवादी काँग्रेस व शिवसेना युतीच्या अधिकृत उमेदवार कविता आनंद चंदनशिवे, सी.ए. सुशील चंदू बंदपट्टे, सारिका विवेक फुटाणे व विश्वनाथ दत्तात्रय बिडवे यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते व मतदार मोठ्या संख्येने उपस्थित होते. लहानांचे प्रेम, थोरांचे आशीर्वाद आणि समाजासाठी काम करण्याची प्रबळ इच्छा हीच आपली खरी पुंजी असल्याचे सांगत, या बळावर विजय निश्चित असल्याचा विश्वास उमेदवारांनी व्यक्त केला.

प्रत्येक मत महत्त्वाचे असून, प्रत्येक घरापर्यंत पोहोचण्याचा निर्धार युतीच्या उमेदवारांनी केला आहे. 'एकच विचार, एकच दिशा – राष्ट्रवादीच्या घड्याळावरच विश्वास' अशी भावना सध्या संपूर्ण प्रभागात दिसून येत आहे.

**'सेवा, शिक्षण आणि संवेदनशीलतेच्या जोरावर प्रभागाचा सर्वांगीण विकास साधणार' – सी.ए. सुशील बंदपट्टे**

सी.ए. सुशील बंदपट्टे यांनी मतदारांशी थेट संवाद साधत विकासाचे स्पष्ट व्हिजन मांडले. आर्थिक शिस्तीच्या माध्यमातून पारदर्शक व लोकाभिमुख प्रशासन देण्याचा त्यांनी निर्धार व्यक्त केला.

**सेवा आणि माणुसकीचा वसा जपणारे नेतृत्व – विश्वनाथ दत्तात्रय बिडवे**

समाजातील सर्व घटकांना सोबत घेऊन काम करणारे, सेवाभावी वृत्तीचे व जनतेच्या अडचणींना तत्परतेने प्रतिसाद देणारे नेतृत्व म्हणून विश्वनाथ बिडवे यांची ओळख आहे.

**सामाजिक व राजकीय वारसा पुढे नेणाऱ्या सारिका विवेक फुटाणे**

फुटाणे कुटुंबात सून म्हणून प्रवेश केल्यानंतर सारिका फुटाणे यांनी केवळ वारसा जपला नाही, तर महिलांना एकत्र आणून त्यांना सामाजिक व उद्योगशील बनवण्याचे प्रभावी कार्य केले आहे.

**सामाजिक जाणिवेचे, सुशिक्षित व सुसंस्कृत व्यक्तिमत्व – कविता आनंद चंदनशिवे**

कविता चंदनशिवे या सामाजिक भान जपणाऱ्या, शिक्षित व संवेदनशील व्यक्तिमत्व म्हणून ओळखल्या जात असून, महिलांच्या प्रश्नांसाठी सातत्याने कार्यरत आहेत.

# श्री सिद्धेश्वर यात्रेनिमित्त पालखी व...

सोलापूर शहराची सांस्कृतिक व धार्मिक ओळख असून या यात्रेच्या माध्यमातून शहरात भक्तीभाव, एकोपा व परंपरेचा वारसा जपला जातो. या पार्श्वभूमीवर महायात्रा शांततेत, सुरक्षिततेत व नियोजनबद्ध पद्धतीने पार पडावी, यासाठी सोलापूर महानगरपालिकेमार्फत व्यापक तयारी करण्यात आली आहे.या पूजन प्रसंगी अस्मिता ओम्बासे अतिरिक्त आयुक्त वीणा पवार, अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे, ईशानी ओम्बासे, आनय ओम्बासे, अंतर्गत लेखा परीक्षक राहुल कुलकर्णी, कामगार कल्याण अधिकारी अजितकुमार खानसोळे, जनसंपर्क अधिकारी गणेश बिराजदार, जय प्रकाश आमनगी यांच्यासह मान्यवर अधिकारी उपस्थित होते.यावेळी मा. आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी श्री सिद्धेश्वर महायात्रा ही सोलापूरच्या अस्मितेचा अविभाज्य भाग असून यात्रेदरम्यान भाविकांच्या सोयीसुविधा, स्वच्छता, वाहतूक, आरोग्य व सुरक्षा व्यवस्था यांना प्राधान्य देण्यात येणार असल्याचे सांगितले. सर्व यंत्रणांनी समन्वयाने काम करून महायात्रा यशस्वीपणे पार पाडावी, असे आवाहनही त्यांनी केले.या पूजनाने श्री सिद्धेश्वर महायात्रेची भक्तिमय सुरुवात झाली असून शहरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# सरकारी कर्मचाऱ्यांना एसटी प्रवास मोफत

**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** सरकारी कर्मचाऱ्यांसाठी एक आनंदाची बातमी समोर आली आहे. म्हणजेच एसटी मध्ये प्रवास करणाऱ्या सरकारी कर्मचाऱ्यांना मोफत प्रवास देण्याचा निर्णय शासनाने घेतलेला असून ८ जानेवारी २०२६ रोजी प्रशासकीय स्तरावरती झालेल्या चर्चेनंतर सरकारी कर्मचाऱ्यांना कर्तव्यावर असताना एसटी बसने मोफत प्रवास करण्याच्या सोबती बाबत काही नवीन मार्गदर्शक तत्वे जारी करण्यात आलेले आहेत.

सरकारी कर्मचाऱ्यांसाठी एक आनंदाची बातमी समोर आली आहे. म्हणजेच एसटी मध्ये प्रवास करणाऱ्या सरकारी कर्मचाऱ्यांना मोफत प्रवास देण्याचा निर्णय शासनाने घेतलेला असून ८ जानेवारी २०२६ रोजी प्रशासकीय स्तरावरती झालेल्या चर्चेनंतर सरकारी कर्मचाऱ्यांना कर्तव्यावर असताना एसटी बसने मोफत प्रवास करण्याच्या सोबती बाबत काही नवीन मार्गदर्शक तत्वे जारी करण्यात आलेले आहेत या निर्णयाचा मुख्य उद्देश हा दुर्गम भागातील काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांचा प्रवास सुलभ करणे आणि त्यांच्या कामाचा दर्जा सुधारणे हा असून हा निर्णय सर्व कर्मचाऱ्यांना सरसकट लागू होणार आहे चला तर मित्रांनो याबद्दलची अधिक माहिती सविस्तरपणे जाणून घेऊया.

जे कर्मचारी अधिकृत सरकारी कामांसाठी एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी प्रवास करत आहेत त्यांना त्यांची ओळखपत्र दाखवल्यावर विनामूल्य किंवा सवलतेच्या दरात प्रवास करता येईल तसेच गृह विभाग आरोग्य विभाग आणि महसूल विभागातील मैदानी स्तरावरती काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना या योजनेत प्रथम प्राधान्य देण्यात येणार आहे. काही जिल्ह्यांमध्ये कर्मचाऱ्यांसाठी मासिक पास किंवा ड्युटी पास देण्याची तरतूद केली जात आहे ज्यांचा खर्च संबंधित विभाग एसटी महामंडळाला घेता येईल अशा हेतूने हे पास देण्यात येणार आहेत.

खासगी वाहनांचा वापर कमी करून एसटीने प्रवास केल्यास सरकारी इंधन आणि भत्त्यात खर्च बचत होईल आणि ग्रामीण आणि डोंगरी भागात रेल्वेची सुविधा नसल्याने एसटी हा एकमेव पर्याय असेल जिथे काम करणाऱ्या शिक्षक अंडी ग्रामसेवकांसाठी ही सवलत मोठी मदत म्हणून ठरेल कर्मचाऱ्याच्या प्रवासाचा खर्च सरकार थेट महामंडळ ला येणार असून एसटीच्या उत्पन्नातही भर होणार आहे तसेच सध्या तरी ही सवलत साधी आणि एशियाड बससाठी विचारात घेतली जात असून शिवनेरी आणि शिवशाही यासारख्या वाहन वातानुकूलित बससाठी प्रवाशांना अतिरिक्त शुल्क भरावे लागू शकतात तसेच त्या प्रवासांची वेगळी पैसे द्यावे लागतील.

# MH-13 FA मालिकेतील आकर्षक नोंदणी क्रमांकासाठी अर्ज करण्याचे आवाहन

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** दुचाकी वाहनांसाठी सुरु होणाऱ्या MH-13 FA मालिकेतील आकर्षक नोंदणी क्रमांक राखून ठेवण्याकरिता अर्ज स्वीकृतीची प्रक्रिया प्रादेशिक परिवहन कार्यालय, सोलापूर येथे सुरु करण्यात आली आहे. वाहनांची नवीन मालिका सुरु होण्याच्या दिवशी होणारी गर्दी टाळण्यासाठी ही पूर्वनियोजनात्मक प्रक्रिया राबविण्यात येत असून नागरिकांना पसंतीचा क्रमांक सुलभतेने मिळावा, यासाठी विहीत शुल्कासह अर्ज सादर करण्याचे आवाहन प्रादेशिक परिवहन अधिकारी, सोलापूर यांनी केले आहे.

**अर्ज सादर करण्याची प्रक्रिया व आवश्यक कागदपत्रे:**

दिनांक 16 जानेवारी 2026 रोजी सकाळी 11.00 ते सायं. 4.00 या वेळेत कार्यालयीन दिवशी विहीत नमुन्यातील अर्ज सादर करावा.

अर्जासोबत क्र.16 अन्वये जारी केलेला डीडी, पत्त्याचा पुरावा, आधार लिंक झालेला मोबाईल क्रमांक, ओळखपत्र व पॅनकार्ड याच्या साक्षांकित प्रती अनिवार्य आहेत.

डीडी फक्त "Dy R.T.O. SOLAPUR" यांच्या नावे नॅशनलाइज/शेड्यूल्ड बँकेचा असावा.

**लिलाव प्रक्रिया:**

एकाच क्रमांकासाठी एकापेक्षा जास्त अर्ज आल्यास त्यांची यादी 16 जानेवारी 2026 रोजी सायं. 5.00 वाजता कार्यालयीन नोटीस बोर्डवर प्रसिद्ध केली जाईल.

यादीतील अर्जदारांनी 19 जानेवारी 2026 रोजी दुपारी 2.00 वाजेपर्यंत सीलबंद लिफाफ्यात लिलावासाठीचा डीडी सादर करावा.

लिलावासाठीचा डीडी रु. 300/- पेक्षा कमी रकमेचा नसावा.

19 जानेवारी 2026 रोजी दुपारी 4.00 वाजता प्रादेशिक परिवहन अधिकारी यांच्या उपस्थितीत लिफाफे उघडून सर्वाधिक रक्कमेचा डीडी सादर करणाऱ्या अर्जदारास पसंतीचा क्रमांक वितरीत केला जाईल.

**महत्वाचे निर्देश:**

एकदा राखून ठेवलेला नोंदणी क्रमांक बदलता येणार नाही.

राखीव क्रमांकासाठी अर्ज केल्यानंतर 180 दिवसांच्या आत वाहन सादर करून नोंदणी पूर्ण करणे आवश्यक आहे. अन्यथा क्रमांक आपोआप रद्द होईल व फी सरकारजमा होईल.

कोणत्याही परिस्थितीत राखीव क्रमांकासाठी दिलेली फी परत करता येणार नाही किंवा समायोजन करता येणार नाही.

**दुचाकी वाहनांसाठी MH-13 FA मालिकेचे वेळापत्रक**

16 जानेवारी 2026 – तिप्पट शुल्काचे अर्ज व परिवहन संवर्ग वाहनांसाठी नियमित अर्ज स्वीकृती

(वेळः सकाळी 11 ते सायं. 4)

**16 जानेवारी 2026 – सायं. 5.00 वा. अर्जांची यादी जाहीर**

19 जानेवारी 2026 – दुपारी 2.00 पर्यंत लिलावासाठीचे रु. 300/- पेक्षा जास्त रकमेचे डीडी जमा करणे गरजेचे

19 जानेवारी 2026 – तिप्पट शुल्काच्या आलेल्या अजार्साठी व परिवहन संवर्ग वाहनांसाठी आलेल्या डबल अर्जांचा लिलाव दुपारी 4.00 वाजता.

नागरिकांनी या प्रक्रियेत सहभागी होऊन पसंतीचा नोंदणी क्रमांक प्राप्त करावा, असे आवाहन प्रादेशिक परिवहन अधिकारी, सोलापूर यांनी केले आहे.

# शंकरनगर येथे अखिल भारतीय त्रिमूर्ती केसरी चषक कुस्ती स्पर्धेला रंगत

**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील जयंती समारंभ समिती व प्रताप क्रीडा मंडळ शंकरनगर अकलूज यांच्यावतीने शिवतीर्थ आखाडा शंकरनगर अकलूज येथे सुरु असलेल्या ४७ व्या अखिल भारतीय त्रिमूर्ती केसरी चषक कुस्ती स्पर्धा व वजन गट कुस्ती स्पर्धेत रंगत आली असून मल्लांमध्ये सळसळता उत्साह निर्माण झाला आहे.



सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील यांच्या जयंतीनिमित्त दि.१२ ते १४ जानेवारी या कालावधीत स्पर्धेचे आयोजन केले आहे. या वेळी माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील, समितीचे संस्थापक जयसिंह मोहिते पाटील, अध्यक्ष मदनसिंह मोहिते पाटील, स्पर्धा प्रमुख सयाजीराजे मोहिते पाटील, मल्ल सम्राट रावसाहेब मगर, बाळासाहेब तरसे, चंद्रकांत मगर, दत्ता मगर, वसंतराव जाधव, पोपट भोसले पाटील, बिभीषण जाधव यांच्यासह विविध संस्थांचे आजी-माजी पदाधिकारी, कुस्ती शौकीन मोठ्या संख्येने उपस्थित होते.

राष्ट्रकुल सुवर्णपदक विजेते व आंतरराष्ट्रीय कुस्ती मार्गदर्शक राम सारंग व त्यांचे पंच स्पधेर्साठी कार्यरत आहेत.

स्पर्धेच्या दुसऱ्या दिवशी तिसऱ्या फेरी अखेर खुल्या गटात अनिल जाधव करमाळा यांच्यावर मात करत रविराज चव्हाण पंढरपूर हे विजेते झाले. श्रीधर वावरे सांगली यांनी सचिन जरांगे अकलूज यांच्यावर मात केली. संकेत शिंदे कंदर यांनी अभिजीत सोनवणे कंदर यांच्यावर मात केली. आर्यन पाटील माळशिरस यांनी सचिन काळे आटपाडी यांच्यावर मात केली. मोहसीन गावडे पुळुज यांनी महादेव झंजे माळशिरस यांच्यावर मात केली. अविनाश गावडे सराटी यांनी हनुमंत काळे कंदर यांच्यावर मात केली. सुरज राऊत निमगाव यांनी अर्जुन सावंत काटी यांच्यावर मात केली. अर्जुन सुळ मोरोची यांनी आदित्य कोकाटे अकलूज यांच्यावर मात केली. सोमनाथ कोकाटे पुणे यांनी निलेश यादव खुडूस यांच्यावर मात केली. सागर देवकाते निमगाव यांनी विक्रम भोसले खवसपूर यांच्यावर मात केली. सायंकाळी उशिरापर्यंत वजनी गट व खुल्या गटाच्या कुस्त्या सुरू होत्या.

अखिल भारतीय त्रिमूर्ती कुस्ती स्पर्धेसाठी ८०, तर वजनी २५ ते ८५ पर्यंतच्या गटा करीता ६०३ मल्लांनी सहभाग घेतला आहे. स्वागत वसंतराव जाधव यांनी केले. सूत्रसंचालन युवराज केचे यांनी केले.

# युती सरकारने महाराष्ट्राचा विकास नाही तर अख्खा महाराष्ट्र भकास करून ठेवला आहे, गृहमंत्र्यांच्या कृपाशीवार्दाने राज्यात गुन्हेगारी फोफावली - ॲड. शंकर चव्हाण यांची जोरदार टीका

**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** महाराष्ट्राला प्रगतीच्या मार्गावर नेण्याचे स्वप्न दाखवणाऱ्या सत्ताधारी युती सरकारने प्रत्यक्षात मात्र राज्याला अराजक, असुरक्षितता आणि अव्यवस्थेच्या गर्तेत लोटले असल्याची तीव्र टीका सोशल मीडियावर मुंबई उच्च न्यायालयाचे वकील ॲड. शंकर चव्हाण यांनी केली आहे. राज्यात विकासाच्या गप्पा मारल्या जात असताना प्रत्यक्ष वास्तव मात्र भयावह आहे. शेतकरी आत्महत्या, महिलांवरील अत्याचार, वाढती गुन्हेगारी, बेरोजगारी, ढासळलेली कायदा-सुव्यवस्था आणि प्रशासनातील अनागोंदी यामुळे महाराष्ट्र आज अक्षरशः भकास झाला असल्याचा आरोप त्यांनी केला.

ॲड. शंकर चव्हाण म्हणाले की, महाराष्ट्र हा कधीकाळी देशाला दिशा देणारा, प्रगतीचा इंजिन मानला जाणारा राज्य होता. मात्र सध्याच्या युती सरकारच्या कार्यकाळात राज्याची घसरण सुरू झाली आहे. विकासाच्या नावाखाली फक्त जाहिरातबाजी केली जात आहे, पण जमिनीवर सामान्य नागरिकाला दिलासा देणारे एकही ठोस काम दिसत नाही. रस्ते, आरोग्य, शिक्षण, रोजगार या मूलभूत प्रश्नांकडे सरकारचे पूर्णतः दुर्लक्ष झाले आहे.

राज्यात गुन्हेगारीचे प्रमाण प्रचंड वाढले असून महिलांवरील अत्याचार, अल्पवयीन मुलांवरील गुन्हे, खून, दरोडे, बलात्कार, सायबर गुन्हे यामध्ये दिवसेंदिवस वाढ होत आहे. 'गुन्हेगारांना कायद्याची भीती उरलेली नाही, कारण त्यांना सत्ताधाऱ्यांचा अप्रत्यक्ष आशीर्वाद मिळतो आहे,' असा गंभीर आरोप ॲड. चव्हाण यांनी केला. गृहमंत्र्यांच्या निष्क्रियतेमुळे पोलीस यंत्रणा दबावाखाली असून अनेक प्रकरणांमध्ये आरोपींना वाचवण्याचे प्रयत्न होत असल्याचे चित्र दिसत असल्याचे ते म्हणाले.

त्यांनी पुढे सांगितले की, राज्यातील ग्रामीण भागात परिस्थिती अधिक गंभीर आहे. शेतकरी कर्जबाजारीपणामुळे आत्महत्या करत आहेत, पण सरकार केवळ घोषणा करून मोकळे होत आहे. मदतीचे पॅकेज कागदावर असते, प्रत्यक्षात मात्र शेतकऱ्यांच्या हातात काहीच पडत नाही. दुसरीकडे शहरांमध्ये बेरोजगार तरुणांच्या हाताला काम नाही. शिक्षित तरुण नोकऱ्यांसाठी वणवण भटकत आहेत, तर सत्ताधारी मंडळी मात्र सत्तासंघर्षात व्यस्त आहेत.

कायदा-सुव्यवस्थेच्या बाबतीत सरकार पूर्णतः अपयशी ठरले आहे, असे सांगत ॲड. शंकर चव्हाण म्हणाले की, 'गृहमंत्री हे राज्यातील नागरिकांच्या सुरक्षेचे मुख्य जबाबदार असतात. मात्र आज परिस्थिती अशी आहे की सामान्य माणूस घराबाहेर पडताना घाबरतो आहे. महिला, लहान मुले, ज्येष्ठ नागरिक कोणीही सुरक्षित नाही. जर राज्यातील नागरिकांना सुरक्षितता देता येत नसेल, तर अशा गृहमंत्र्यांना सत्तेत राहण्याचा नैतिक अधिकार नाही.'

त्यांनी हेही नमूद केले की, प्रशासनात भ्रष्टाचार मोठ्या प्रमाणावर वाढला आहे. सरकारी कार्यालयात सामान्य नागरिकांचे काम वेळेत होत नाही. प्रत्येक ठिकाणी दलाली, टक्केवारी आणि राजकीय हस्तक्षेप यामुळे प्रशासन पोखरले गेले आहे. पोलीस यंत्रणेवर राजकीय दबाव असल्याने निष्पक्ष कारवाई होत नाही. याचा थेट फायदा गुन्हेगारांना होत असून सामान्य जनता मात्र भरडली जात आहे.

राज्यात सुरू असलेल्या राजकीय अस्थिरतेवरही त्यांनी भाष्य केले. 'सत्तेसाठी पक्षांतर, गद्दारी आणि सत्ताकारण सुरू आहे. जनतेच्या प्रश्नांपेक्षा सत्ताधाऱ्यांना खुर्चीची जास्त काळजी आहे. विधानसभा, मंत्रिमंडळ आणि प्रशासन हे सर्व सत्तासंघषार्चे केंद्र बनले आहे,' असे ते म्हणाले. युती सरकारकडे कोणताही स्पष्ट विकास आराखडा नसून केवळ सत्तेत टिकून राहण्याचा अजेंडा असल्याचा आरोप त्यांनी केला.

ॲड. शंकर चव्हाण यांनी सरकारला इशारा देताना सांगितले की, 'महाराष्ट्राची जनता आता जागी होत आहे. अन्याय, अत्याचार आणि असुरक्षिततेविरोधात लवकरच जनतेचा उद्रेक होईल. सरकारने वेळेत आत्मपरीक्षण केले नाही, तर याचे गंभीर परिणाम भोगावे लागतील.' त्यांनी राज्यातील नागरिकांना देखील आवाहन केले की, त्यांनी आपल्या हक्कांसाठी आवाज उठवावा आणि चुकीच्या कारभाराविरोधात एकत्र यावे.

शेवटी त्यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, महाराष्ट्राला पुन्हा एकदा प्रगतीच्या मार्गावर न्यायचे असेल, तर सक्षम नेतृत्व, पारदर्शक प्रशासन आणि कठोर कायदा-सुव्यवस्था आवश्यक आहे. 'आज गरज आहे ती केवळ घोषणा नव्हे, तर ठोस कृतीची. अन्यथा हा भकास महाराष्ट्र भविष्यात आणखी अंधाराकडे जाईल,' असा इशाराही ॲड. शंकर चव्हाण यांनी दिला.

# मतदान केंद्रांवर मतदारांनी मोबाईल आणू नये

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने येत्या निवडणुकीदरम्यान मतदान केंद्राबाहेर मतदारांसाठी मोबाईल फोन जमा करण्यासाठी स्वतंत्र कक्ष उभारणे शक्य होणार नसल्याची माहिती देण्यात आली आहे. स्थानिक परिस्थिती, कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न तसेच उपलब्ध स्वयंसेवकांची कमतरता या बाबी लक्षात घेता हा निर्णय घेण्यात आल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

मतदान प्रक्रिया सुरळीत, शांततापूर्ण व पूर्णतः पारदर्शकपणे पार पडावी, यासाठी मतदारांनी मतदानासाठी येताना शक्यतो मोबाईल फोन सोबत आणू नयेत, असे आवाहन सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने करण्यात आले आहे. मतदान केंद्र परिसरात मोबाईल वापरास निर्बंध असल्याने गैरसमज, वाद किंवा कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये, हा या आवाहनामागील उद्देश असल्याचे प्रशासनाने सांगितले.

एखाद्या अपरिहार्य कारणामुळे मतदार मोबाईल फोन सोबत आणत असतील, तर तो मोबाईल फोन मतदान केंद्राबाहेर सुरक्षित ठेवण्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित मतदाराची राहणार आहे. मोबाईल फोन हरवणे, चोरी होणे अथवा नुकसान होणे याबाबत महानगरपालिका किंवा निवडणूक यंत्रणा कोणत्याही प्रकारे जबाबदार राहणार नाही, असेही प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

मतदानादरम्यान कोणताही गोंधळ अथवा अनुचित प्रकार टाळण्यासाठी सर्व मतदारांनी निवडणूक नियमांचे काटेकोर पालन करावे व प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने करण्यात आले आहे. शांत व निर्भय वातावरणात मतदान पार पडावे, यासाठी मतदारांचा सक्रिय सहभाग आवश्यक असल्याचेही प्रशासनाने नमूद केले आहे.

## जाहीर प्रसिध्दीकरण

क्र. अभि/कावि नं ४०४/२०२५

**मोहोळ येथील मे.तहसिलदार सो,यांचे समोर**

श्री. कृष्णा नामदेव आदलिंगे वय - ३९ वर्षे, धंदा- शेती रा. बुधवार पेठ, मोहोळ,ता. मोहोळ, जि. सोलापूर } अर्जदार

**विरूद्ध**

नगरपरिषद मोहोळ,ता. मोहोळ, (अर्जाची नोटीस मुख्याधिकारी नगरपरिषद मोहोळ, यांचेवर बजावविण्यात यावी.) } सामनेवाला

ज्याअर्थी वर नमुद अर्जदाराची आई म्हणजेच सुंदर नामदेव आदलिंगे यांचा मृत्यु ता.२१/०३/२०२१ रोजी मौजे मोहोळ, ता. मोहोळ, जि. सोलापूर येथे झाला आहे. अर्जदार याने सदर सामनेवाला यांचेकडे अर्जदाराची आई म्हणजेच सुंदर नामदेव आदलिंगे यांचा मृत्यु दाखल्याची ता. २१/०३/२०२१ रोजीप्रमाणे मागणी नमुद तारखेनुसार केली असता त्यावेळी सामनेवाला यांनी त्यांच्याकडील माहे मार्च २०२१ चे अभिलेखात अर्जदाराची आई म्हणजेच

सुंदर नामदेव आदलिंगे यांच्या मृत्युची नोंद नसल्याबाबतचा दाखला दिला व त्याबद्दल सदर अर्जदाराने या मे. कोर्टात सामनेवाला यांचेकडील अभिलेखात मृत्युची नोंद घेणेबाबत आदेश होणेसाठी अर्ज केला आहे. याबाबत कोणाचा आक्षेप/हरकत असल्यास दि.०६/०२/२०२४ रोजी किंवा ही नोटीस प्रसिध्द केल्यापासुन ३० दिवसाचे आत समक्ष अथवा वकीलामार्फत मे. कोर्टात हजर राहुन आपले म्हणणे मांडावे. मुदतीत कोणाची कसलीही हरकत नाही आल्यास अर्जातील मागणीप्रमाणे मृत्यु दाखला देणेबाबत सामनेवाला यांना आदेश करण्यात येईल याची नोंद घ्यावी.हे प्रसिध्दीकरण आमचे सहीनिशी व शिक्यानिशी दिले असे. ता.१३/०१/२०२६

हुकूमावरुन

लिपीक (शिक्का) तहसीलदार मोहोळ सोलापूर

## जाहीर प्रसिध्दीकरण

क्र. अभि/कावि नं ५२६/२०२५

**मोहोळ येथील मे. तहसिलदार सो, यांचे कोर्टात**

श्री. श्रीकांत धर्मराज कोल्हाळ
वय - ६१ वर्षे, धंदा- शेती,
स. शिवाजी नगर, नोसिल नाका,घन्सोली, नवी मुंबई } अर्जदार

विरुध्द

ग्रामपंचायत एकुरके,
ता. मोहोळ, (अर्जाची नोटीसग्रामसेवक ग्रामपंचायत एकुरके, यांचेवर बजावविण्यातयावी.) } सामनेवाला

ज्याअर्थी वर नमुद अर्जदाराचे वडिल म्हणजेच धर्मराज रामा कोल्हाळ यांचा मृत्यु ता. १०/०८/१९९१ रोजी मौजे एकुरके, ता. मोहोळ जि. सोलापूर येथे झाला आहे. अर्जदार याने सदर सामनेवाला यांचेकडे अर्जदाराचे वडिल म्हणजेच धर्मराज रामा कोल्हाळ यांचा मृत्यु दाखल्याची ता. १०/०८/१९९१ रोजीप्रमाणे मागणी नमुद तारखेनुसार केली असता त्यावेळी सामनेवाला यांनी त्यांच्याकडील माहे ऑगस्ट १९९१ चे अभिलेखात अर्जदाराचे वडिल म्हणजेच धर्मराज रामा कोल्हाळ यांच्या मृत्युची नोंद नसल्याबाबतचा दाखला दिला व त्याबद्दल सदर अर्जदाराने या मे. कोर्टात सामनेवाला यांचेकडील अभिलेखात मृत्युची नोंद घेणेबाबत आदेश होणेसाठी अर्ज केला आहे. याबाबत कोणाचा आक्षेप/हरकत असल्यास दि. २८/०१/२०२६ रोजी किंवा ही नोटीस प्रसिध्द केल्यापासुन १५ दिवसाचे आत समक्ष अथवा वकीलामार्फत मे. कोर्टात हजर राहुन आपले म्हणणे मांडावे. मुदतीत कोणाची कसलीही हरकत नाही आल्यास अर्जातील मागणीप्रमाणे मृत्यु दाखला देणेबाबत सामनेवाला यांना आदेश करण्यात येईल याची नोंद घ्यावी.हे प्रसिध्दीकरण आमचे सहीनिशी व शिक्यानिशी दिले असे. ता. १४/०१/२०२६

हुकूमावरुन

लिपीक (शिक्का) तहसीलदार मोहोळ सोलापूर

(सरकार मान्य)
**अथर्व पेस्ट कंट्रोल**
An ISO 9001-15 सर्टीफाईड कंपनी
प्रोप्रा. हरी सुभाष विरपे
9822964815
9421984815
झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण

**निर्मल व्यसनमुक्ती केंद्र**
**मानसिक आजार, व्यसनमुक्ती, लैंगिक समस्या** स्किझोफ्रेनिया, बायपोलार मुड डिसऑर्डर, उन्माद, डिप्रेशन, ओ. सी. डी, मंत्रचळेपणा इ. मानसिक आजारासाठी, दारू, तंबाखु, सिगारेट, गुटखा, मावा, गांजा, भांग, मिश्री इ. व्यसनमुक्तीसाठी, शीघ्रपतन, नपुसकता, वीर्यनाश, हस्तमैथुनामुळे कमजोरी इ. लैंगिक समस्यांसाठी वृद्ध लोकांना सांभाळण्यासाठी सुश्रुषा केंद्र व नातेवाईकांशिवाय ॲडमीट करण्याची सोय
**निर्मल व्यसनमुक्ती पुनर्वसन व सुश्रुषा केंद्र, स्टेशन रोड, मिरज.**
-: संपर्क :-
8083608083
9922646566
8698732109

**वाचकांसाठी निवेदन:** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.

# बंजारा समाजाचा प्रभाग ६ मधील भाजपच्या उमेदवारांना एकमुखी जाहीर पाठिंबा

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** प्रभाग क्रमांक ६ मधील भाजपचे उमेदवार पॅनल प्रमुख गणेश वानकर, सुनील खटके, सोनाली गायकवाड व मृण्मयी गवळी यांनी प्रभागातील शेवटच्या जनतेपर्यंत घरोघरी जाऊन प्रचाराचा धडाका सुरूच ठेवला आहे. सोमवारी सायंकाळी बसवेश्वर नगरातील सेवालाल मंदिरासमोरील पटांगणात आयोजित करण्यात आलेल्या कॉर्नर सभेप्रसंगी हजारो बंजारा समाजबांधवांनी विकासाच्या पाठीशी राहण्याचा निर्णय घेत भाजपच्या उमेदवारांना जाहीर पाठिंबा दिला.




बंजारा समाज बांधवांच्यावतीने भाजप उमेदवारांवर जेसीबीमधून पुष्पवृष्टी करून उमेदवारांचे जंगी स्वागत केले. जय सेवालाल, भरतील जनता पार्टीर्चा विजय असो, पंतप्रधान नरेंद्र मोदी तुम आगे बढो, हम तुम्हारे साथ है, देवेंद्र फडणवीस तुम आगे बढो, हम तुम्हारे साथ है या घोषणांनी परिसर दणाणून गेला होता. बंजारा समाजासाठी वस्त्यांमध्ये पिण्याचे पाणी, ठिकठिकाणी अंतर्गत रस्ते, ड्रेनेज लाईन तसेच पिण्याच्या पाण्याची टाकी हि अत्यंत महत्वाची कामे केली आहेत. उर्वरित विकास कामेसुद्धा आपणच पूर्णत्वास नेणार आहोत, असे सांगत बंजारा समाजबांधवानी सत्ताधारी भाजपसोबत राहण्याचे आवाहन पॅनल प्रमुख गणेश वानकर यांनी यावेळी बोलताना केले.

याप्रसंगी भैय्या राठोड, नाईक राजू राठोड, नाईक गणेश पवार, नाईक राजू पवार, नाईक रमेश राठोड, कारभारी मनोहर पवार, प्रेम राठोड, संजय राठोड, चव्हाण, सुरेश पवार, लाला पवार, रवी चव्हाण, प्रकाश राठोड, अक्षय सावकार, लेखन राठोड, किरण चव्हाण, जनाबाई राठोड, ताराबाई राठोड, बसू रासेराव यांच्यासह बंजारा समाजातील प्रतिष्ठित नागरिक व लाडक्या बहिणी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# तब्बल 35 हजार नागरिक मतदानावर बहिष्कार टाकणार; बॅनर झळकले

**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** मुंबईत मतदानाचा टक्का वाढावा यासाठी प्रशासनाकडून जनजागृती सुरु असताना उच्चभ्रू परिसर अशी ओळख असणाऱ्या जुहूमधील ३५ हजार नागरिकांनी आक्रमक पवित्रा घेतला आहे. जुहू परिसरात असलेल्या २०० इमारतींमध्ये राहणाऱ्या ३५ हजार नागरिकांनी मतदानावर बहिष्कार टाकण्याचा निर्णय घेतला आहे.


तसे बॅनर जुहू रुईया पार्क, कराची सोसायटी परिसरात लागले आहेत.

जुहू परिसरात मिलिटरी रडार असल्याचा फटका इथे राहणाऱ्या नागरिकांना बसतो. गेल्या ३५ वर्षांपासून इथल्या २०० धोकादायक इमारती आणि २ झोपडपट्ट्यांचा पुनर्विकास रखडला आहे. नागरिकांचं पुनर्वसन होऊ शकत नसल्यानं मोठी समस्या निर्माण झाली आहे. इथले ३५ हजार नागरिक जीव मुठीत राहत आहेत. आमच्या समस्यांकडे पाहायला लोकप्रतिनिधींना वेळ नाही. मग आम्ही मतदान का करायचं, असा प्रश्न इथले नागरिक विचारत आहेत.

परिसरातील २०० इमारती आणि २ झोपडपट्ट्यांमध्ये राहणाऱ्या लोकांनी त्यांच्या समस्या केंद्र सरकारच्या संरक्षण विभागासमोर मांडल्या. या संदर्भात बराच पाठपुरावादेखील केला. पण हाती काहीच ठोस लागलेलं नाही. त्यामुळे वैतागलेल्या नागरिकांनी मतदानावर बहिष्कार टाकण्याचा निर्णय घेतला आहे. तसे बॅनर परिसरात लागलेले आहे. त्यावर जुहू वाचवा, मध्यम वर्ग आणि गरीब कुटुंबांना वाचवा, असा उल्लेख आहे.

SRO150 कायदा कालबाह्य असून त्यामुळे घरं उद्ध्वस्त होत आहेत. १९३९ च्या ब्रिटिश कायद्याच्या अंतर्गत आम्हाला आमच्या घरांमधून हाकलण्यात आलं आहे. २०० इमारती आणि २ झोपडपट्ट्या धोक्यात आल्या आहेत. इथल्या ३५ हजार नागरिकांवर अन्याय होत आहे. त्यामुळे मतदानासाठी घराबाहेर पडण्यासाठी पाऊल टाकण्याआधी १०० वेळा विचार करा, असं आवाहन स्थानिकांना करण्यात आलं आहे.

## कटूसत्य शब्दकोडे



**उभे शब्द :** १) हिंदी सिनेसृष्टीतील महानायक अभिनेता २) नदीचा काठ, बाण ३) अंतराळात प्रवास करणारे वाहन, नया उलट लिहा ४) उजेड ५) साठ मिनिटांचा एक ** ६) वायू, वारा ७) दुप्पट (इंग्रजीत) ११) नोकरच्या विरूध्दार्थी, धनी १२) गन उलट लिहा १३) कर्मचाऱ्यांना मिळणारा पगार १५) एक (इंग्रजीत) १७) फोटो (हिंदीत) २१) दहा (हिंदीत) २२) श्रीरामाचा एक बंधू २३) उद्या (हिंदीत) २४) ढग (हिंदीत) २५) दशमी नंतरचा दिवस २६) दहा (इंग्रजीत) २८) थकीत येणे राहिलेली रक्कम ३०) घोड्याच्या पायाच्या खुराला ठोकतात ती अर्धवर्तुळाकार पट्टी ३३) आदर सत्कार, ** सन्मान ३४) पुण्यातील प्रसिध्द गणपती-***** हलवाई ३५) वाईट सवय ३६) आठवड्यातील एक वार ३७) मालावर भरावा लागणारा कर, टॅक्स ३८) दुधावरील मलई ४०) लहान बाळाला टोचतात ती ४२) दशरथपुत्र ४४) दात ४५) तीन दुणे ४७) शरीर (हिंदीत), दक उलट लिहा ४८) सायकलच्या चाकाच्या या भागावर टायर बसवितात

**आडवे शब्द :** १) गुढीपाडव्यानंतरचा एक सण
४) भवानीमातेचे मंदिर छ. शिवरायांनी या किल्ल्यावर बांधले आहे
८) क्रिकेटमधील धाव (इंग्रजीत) ९) सशाशी शर्यत लावणारा कथेतील प्राणी
१०) हवामानातील उष्मा १३) पोशाख, एक म्हण-जसा देश तसा **
१४) आश्चर्य १६) नजीक, समीप १८) मोफत (इंग्रजीत)
१९) पाण्यावर तरंगणारा एक पक्षी २०) घर, निवास २४) अकरा दुणे
२५) मोबाईल फोनची सेवा पुरविणारी आयडिया प्रमाणे एक कंपनी
२७) स्त्रियांचा नाकातील दागिना २९) वस्तूचे मूल्य, भाव
३०) अनेक रस्ते एकत्र येतात असे मोक्याचे ठिकाण ३१) शरीर, काया
३२) किमानच्या विरूध्दार्थी
३४) पाणीयुक्त चिखल, गाळ ३७) जीभ (हिंदीत) ३८) घर वा फर्निचरकरता या वृक्षाचे लाकूड वापरतात ३९) थंड, गार, मुलीचे एक नाव ४१) काकाची बायको
४२) एक माजी भारतीय फलंदाज-अंबाती *** ४३) वाकडातिकडा नसलेला, स्ट्रेट
४५) मस उलट लिहा ४६) शेकाप पक्षाचे पूर्ण नाव-**** कामगार पक्ष
४९) औषध (हिंदीत) ५०) पाच दुणे ५१) बारा गुणिले पाच
५२) गुजरात जवळील केंद्रशासित प्रदेश-दिव ***

## सुडोकु - 151

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 8 | 3 | | | | | 1 | | |
| | | | | | 2 | 3 | | |
| 1 | | | | 5 | | | | 4 |
| 9 | 8 | | 1 | | 5 | | 7 | 2 |
| 2 | 5 | 7 | 9 | | | | 3 | 1 |
| 6 | 1 | 3 | 7 | 2 | 8 | | 4 | |
| 4 | 2 | | 5 | | 1 | | | 3 |
| | 7 | 8 | | | 9 | | | 5 |
| | 6 | | 4 | | | | | |

## श्री शिवयोगी सिद्धरामेश्वरांच्या यात्रेनिमित्त येणाऱ्या तमाम भाविकांचे हार्दिक स्वागत व मकरसंक्रांतीच्या हार्दिक शुभेच्छा...!



शुभेच्छुकः-

Adv. Dhanayya G. Chivari
ॲड. धानय्या जी. चिवरी
B.Com., LL.B.
Cell : 9422380345
email : dgchivari@gmail.com
(Notary - Govt. Of India)

Adv. Mangala D. Chivari
ॲड. मंगला डी. चिवरी
(एम.एस. कुर्वलकर) (B.A., LL.B.)
Cell : 9022095682
email : mdchivari@gmail.com
(नोटरी-भारत सरकार)

Adv. Mayureshwar D. Chivari
ॲड. मयुरेश्वर धा. चिवरी
M.Sc. B.Ed., LL.B.
Cell : 9552812593

ओमधाम, २१५, पूर्व मंगळवार पेठ, सोलापूर.


# सर्व वाहन चालकांनी वाहतुकीच्या नियमांचे काटेकोर पालन करावे - जिल्हाधिकारी आशीर्वाद



**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** संपूर्ण देशभरात तामिळनाडू व महाराष्ट्र राज्यात रस्ते अपघातांचे प्रमाण खूप अधिक आहे. रस्ते अपघातामध्ये मानवी चुका तसेच तांत्रिक चुकांचाही समावेश आहे. तरी सर्व प्रकारच्या वाहन चालकांनी परिवहन विभागामार्फत करण्यात आलेल्या वाहतूक नियमांचे काटेकोरपणे पालन करण्याचे आवाहन जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी केले.

नियोजन भवन येथे 37 वे जिल्हा रस्ता सुरक्षा अभियान या कार्यक्रमाचे उद्घाटन जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दीप प्रज्वलनाने केले. यावेळी महापालिका आयुक्त सचिन ओंबसे, मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, पोलीस आयुक्त एम राजकुमार, पोलीस अधीक्षक ग्रामीण अतुल कुलकर्णी, अधीक्षक अभियंता सार्वजनिक बांधकाम शामराव कुंभार, प्रादेशिक परिवहन अधिकारी गजानन नेरपगार, कार्यकारी अभियंता मनोज ठाकरे, पोलीस उपायुक्त शहर गौहर हसन, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी विजय पाटील, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी अकलूज अमरसिंह गवारे, सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी आसिफ मुलाणी तसेच अधिकारी कर्मचारी मोटर ड्रायव्हिंग स्कूल संघटनेचे पदाधिकारी, रिक्षा चालक-मालक संघटना पदाधिकारी व इंजीनियरिंग कॉलेजचे विद्यार्थी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी आशीर्वाद पुढे म्हणाले की, सोलापूर शहरामध्ये कोणीही दुचाकी चालवत असताना हेल्मेट वापरत नसल्याचे दिसते. वाहन चालवताना अतिवेग व चुकीच्या बाजूने ओव्हरटेक करणे, सिग्नलचे पालन न करणे यामुळे अपघात होत असतात, सर्व वाहनचालकांनी विशेषता तरुण वर्गाने वाहतुकीचे नियम पाळणे आवश्यक आहे तसेच आपल्या संपकार्तील घरातील इतर व्यक्तींना वाहतुकीचे नियम पाळण्यास जागृत केले पाहिजे, असे आवाहन त्यांनी केले.

यावेळी प्रास्ताविक करताना प्रादेशिक परिवहन अधिकारी गजानन नेरपगार यांनी रस्ते अपघाताची कारणे व रस्ते अपघाताचे प्रमाण तसेच अपघात टाळण्यासाठी काटेकोरपणे नियमाचे पालन करणे व 18 ते 45 वयोगटात तीन व्यक्तींचा अपघातात मृत्यू पडण्याचे प्रमाण जास्त असल्याचे सांगितले तसेच सोलापूर जिल्ह्यात अपघाताचे प्रमाण जास्त असल्याचेही त्यांनी सांगितले आज 13 जानेवारी हा दिवस देशभरामध्ये रस्ता सुरक्षा अभियान म्हणून साजरा केला जातो त्या अनुषंगाने तरुण वर्गाने दुचाकी चालवताना हेल्मेट चा वापर करणे रस्त्यावरील वाहतुकीचे नियमाचे पालन करणे वेग मयार्दा पाळणे याबाबत मार्गदर्शन केले.

सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता शामराव कुंभार यांनी रस्त्यांची स्थिती रस्त्यावरील फलक वेग या तांत्रिक बाबीचे अवलोकन वाहनधारकांनी वाहन चालवताना केल्यास रस्त्याचे अपघात कमी होऊ शकतात. रस्त्याचे बांधकाम हे त्या त्या परिस्थितीनुसार केलेले असते त्यानुसार वाहन चालकाने वाहनाच्या वेगावर नियंत्रण ठेवले पाहिजे असे सांगितले.

तसेच या रस्ते अपघातात जखमी लोकांना मदत करून त्यांना जीवदान दिलेले जीवनदूत अशा व्यक्तींना जिल्हाधिकारी व इतर अधिकाऱ्यांच्या हस्ते जीवनदीप पुरस्कार देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. यामध्ये पोलीस अधिकारी कर्मचारी, प्रादेशिक परिवहन कर्मचारी, तसेच समाजातील इतर व्यक्तींचा समावेश होता.

प्रारंभी जिल्हा रस्ता सुरक्षा समिती सोलापूर, प्रादेशिक परिवहन कार्यालय सोलापूर व सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने 37 वे रस्ता सुरक्षा अभियान 2026 चे उद्घाटन जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या हस्ते संपन्न झाले. या कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन उपप्रादेशिक परिवहन अधिकारी विजय पाटील यांनी केले.


## सहकर महर्षि कै. शंकरराव नारायणराव मोहिते - पाटिल यांच्या जयंती निमित्त विनम्र अभिवादन...!



चेअरमन, व्हा. चेअरमन, सचिव व सभासद
कृषी उत्पन्न बाजार समिती सेवक
सहकारी पतसंस्था मर्या. अकलूज


# वाखरी गटात काळेंचा संक्रांतीनिमित्त हजारों महिलांचा स्नेहमेळावा




**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** मकर संक्रांतीच्या पावन पर्वानिमित्त वाडीकुरोली येथे राष्ट्रवादीचे प्रांतिक सदस्य परिवाराचे कुटुंबप्रमुख कल्याणराव काळे यांच्या मार्गदर्शनाखाली हुरडा पार्टी, महिला स्नेहमेळावा तसेच 'सन्मान नारी शक्तीचा' हा सांस्कृतिक कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला. या कार्यक्रमाला वाखरी गटातील हजारो महिला माता-भगिनींची अभूतपूर्व उपस्थिती लाभली.

सहकार शिरोमणी वसंतदादांचा सामाजिक वारसा अखंडपणे पुढे नेत असताना सार्वजनिक व राजकीय कार्यक्रमांमध्ये पुरुषांची संख्या अधिक असते. मात्र, घर, संसार, कुटुंब व विविध जबाबदाऱ्यांमध्ये गुंतलेल्या माता-भगिनींनाही स्वतःसाठी काही क्षण आनंदाचे, मनमोकळेपणाचे व एकमेकांशी संवाद साधण्याचे मिळावेत, या आपुलकीच्या भावनेतून या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सुमारे चार तास महिलांनी दैनंदिन ताणतणाव विसरून हुरड्याचा आस्वाद घेत मनमुराद आनंद लुटला.

यावेळी उपस्थित महिलांनी भावना व्यक्त करताना सांगितले की, हा कार्यक्रम केवळ हुरड्यापुरता मर्यादित नव्हता, तर आपुलकी, सन्मान, विश्वास व नात्यांचा जिव्हाळा देणारा हा अनुभव आयुष्यभर लक्षात राहणारा ठरला आहे.

कार्यक्रमात श्रीराम शिक्षण प्रसारक मंडळाच्या संचालिका सौ. संगीताताई काळे, सौ. जयश्रीताई काळे तसेच जिल्हा परिषद वाखरी गटातून निवडणूक लढवणार असलेल्या मोनिकाताई काळे यांनी उपस्थित महिलांचे मनःपूर्वक स्वागत केले. काळे परिवारातील कुटुंबप्रमुख आईसाहेब मालनकाकू काळे व सुमनकाकू काळे यांची उपस्थिती कार्यक्रमाला विशेष भावनिक उंची देणारी ठरली.

या प्रसंगी महिलांनी एकमुखाने, ह्लकाळे कुटुंब आमचा विश्वास आणि आमचा परिवार आहे. आम्ही कायम काळे कुटुंबासोबत आहोत,ह्व असा ठाम निर्धार व्यक्त करत मोनिकाताई काळेंना आपला जाहीर पाठिंबा दिला. त्यामुळे वाखरी गटात मोनिकाताई काळेंना महिला शक्तीचा भक्कम पाठिंबा मिळत असल्याचे स्पष्ट झाले.

महिलांच्या सन्मान, संस्कृती व सक्षमीकरणाचा जागर करणारा आनंददायी सांस्कृतिक कार्यक्रम राहुल नवनाथ राजे यांनी प्रभावीपणे सादर केला.

यावेळी बोलताना सौ. संगीताताई काळे म्हणाल्या की, सामाजिक कार्य करताना आपल्या माणसांची साथ, प्रोत्साहन व भक्कम आधार अत्यंत महत्त्वाचा असतो. आज माता-भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या कार्यक्रमाचा आनंद वाढवला असून हीच साथ सदैव कायम राहावी, असे आवाहन त्यांनी केले.

मोनिकाताई काळे यांनी उपस्थित सर्व माता-भगिनींचे आभार मानत सांगितले की, सहकार शिरोमणी वसंतदादांची सून म्हणून तुमचा आशीर्वाद घेण्यासाठी मी तुमच्यासमोर येणार असून दादांचा वसा व वारसा प्रामाणिकपणे पुढे चालू ठेवण्याचा निर्धार केला आहे.

कार्यक्रमाच्या शेवटी विविध स्पर्धांमधील विजेत्या महिलांना आकर्षक भेटवस्तू देऊन सन्मानित करण्यात आले. तसेच मकर संक्रांतीनिमित्त काळे परिवाराच्या वतीने उपस्थित सर्व महिलांना भेटवस्तू देऊन सन्मान करण्यात आला.





सहकार महर्षि शंकरराव नारायणराव मोहिते-पाटील
यांच्या १०८ व्या जयंतीनिमित्त
त्यांच्या पवित्र स्मृतिस
विनम्र अभिवादन !

श्री विजय गणेशोत्सव मंडळ ट्रस्ट लि;
शंकरनगर-अकलूज
शंकरनगर (अकलूज), ता. माळशिरस, जि. सोलापूर
सर्व ट्रस्टी



## महानगरपालिका निवडणूक - २०२५ - २६

# आपलं एक मत ठरविणार




मतदान दि १५ जानेवारी २०२६
वेळ - सकाळी ७:३० ते सायं ५. ३०

राज्य निवडणूक आयोग महाराष्ट्र
MaharashtraSEC

कर मतदान... सांगतंय संविधान!